विकासामध्ये आवड असावी व स्वतःला माहित असलेले तंत्रज्ञान इतर लोकांना माहित करुन देण्याची मानसिकता त्याच्याकडे असावी. क्लबच्या क्षेत्रातील एखाद्या तज्ञ व्यक्तिला सुध्दा सह स्वयंसेवक म्हणून निवडता येते.

### फार्मर्स क्लबचे पदाधिकारी :

निवडलेल्या सदस्यांमधून क्लबच्या मुख्य स्वयंसेवकाची निवड करावी. आवश्यकतेनुसार उपमुख्य स्वयंसेवक व सचिव सवयंसेवकांची सुध्दा निवड करता येते.

### फार्मर्स क्लबला नाबार्ड कडून संमती मिळविणे :

नाबार्ड अशा प्रकारच्या क्लबला अर्थसहाय्य पुरविते त्यासाठी या क्लबची मान्यता नाबार्ड कडून मिळविणे आवश्यक असते. निवड केलेल्या सर्व सभासदांची माहिती विहीत नमुन्यात भरुन त्या कार्यक्षेत्रातील संबंधित बँकेमार्फत किंवा कृषि विज्ञान केंद्रामार्फत नाबार्डच्या विभागीय कार्यालयाला पाठवावी त्या नंतर नाबार्ड कडून त्यास स्वीकृती मिळते.

### क्लबचे उद्घाटन :

नाबार्ड कडून त्यास स्वीकृती मिळाल्यावर संबंधीत बँकेच्या शाखा प्रबंधकांनी किंवा कृषि विज्ञान केंद्राच्या प्रमुख शास्त्रज्ञांनी नाबार्डच्या संबंधीत अधिकाऱ्यांशी संपर्क साधुन उद्घाटनाचा दिवस निश्चीत करावा. या कार्यक्रमाला नाबार्डचे संबंधित अधिकारी उपस्थित राहून मार्गदर्शन करतात. उद्घाटनाचा उद्देश संबंधित बँकेचे अधिकारी किंवा कृषि विज्ञान केंद्राचे शास्त्रज्ञ यांच्याशी शेतकऱ्यांची ओळख व्हावी हा असतो. तसेच क्लबचा उद्देश सर्व शेतकऱ्यांना व्यवस्थित समजावा हा असतो. या कार्यक्रमाला स्वयंसेवक शेतकऱ्या व्यतिरिक्त इतर शेतकरी तसेच ग्रामिण युवक यांना बोलवावे.

या कार्यक्रमाची सुरूवात कर्जाच्या माध्यमातून विकास व कर्जपरतफेडीचे महत्त्व या सिध्दांताबद्दल माहिती सांगून होते.

### स्वयंसेवक (सदस्य) शेतकऱ्याचा परिचयात्मक प्रशिक्षण कार्यक्रम :

सोईसाठी अशा प्रकारचा कार्यक्रम उद्घाटनानंतर लगेच ठेवला जातो त्यामुळे वेळ, खर्च व परिश्रमांची बचत होते. या कार्यक्रमात खालील मुद्द्यावर चर्चा होते.

१. क्लबचे मुख्य स्वयंसेवक, इतर स्वयंसेवक, बँकेचे शाखा प्रबंधक किंवा कृषि विज्ञान केंद्र यांची भुमिका
२. क्लबच्या पुढील बैठकांचा कार्यक्रम
३. बँकेच्या नवीन योजनांची माहिती.
४. आमंत्रित केलेल्या विषय तंज्ञाकडून संबंधित विषयांची माहिती.
५. बैठकीच्या कार्यवाहिची व इतर नोंदी (उदा. खर्च) व्यवस्थित नोंद करून ठेवणे.
६. बँकेच्या अर्थसहाय्यातून ग्राम विकास योजना बनविणे.
७. क्लबच्या संबंधित इतर कार्यक्रमांची माहिती करुन घेणे.
८. क्लबच्या कार्यक्षेत्रातील इतर संस्थाची मदत घेण्याबद्दल माहिती करुन घेणे.
९. क्लब कडून संभाव्य होऊशकणाऱ्या चुकांची माहिती करुन घेणे.
१०. आवश्यकतेनुसार क्लबची नियमावली बनविणे.

### मुख्य स्वयंसेवक व अन्य पदाधिकाऱ्याचे कार्य :

मुख्य स्वयंसेवकाने क्लबचे इतर पदाधिकाऱ्यांशी चर्चा करुन बैठकित तारीख निश्चित करावी. बैठकीचे संचलन मुख्य स्वयंसेवकाने करावे. इतर स्वयंसेवकाच्या/पदाधिकाऱ्यांच्या मदतीने सर्व नोंदी व्यवस्थित ठेवाव्या. क्लबच्या नावाने बँकेत स्वतंत्र खाते उघडावे. मुख्य स्वयंसेवकाने कमीत कमी एका क्लबच्या पदाधिकाऱ्याला बरोबर घेऊनच बँकेचे व्यवहार करावेत. गावातील इतर सामाजिक कार्यात उदा. ग्रामस्वच्छता, शिक्षण, सार्वजनिक श्रमातून रस्ते बनविणे इ. कार्यक्रमात नेतृत्व करावे. स्वयंसेवकांना आवश्यक वाटले



तर क्लबच्या नियमानुसार एका ठराविक वेळेनंतर नेतृत्व बदल करु शकतात. मुख्य स्वयंसेवकांच्या अनुपस्थितीमध्ये उपमुख्य स्वयंसेवक किंवा सचिव स्वयंसेवक बैठकिचे संचालन करतील.

### स्वयंसेवकांचे कार्य :

पदाधिकाऱ्यासहित सर्व स्वयंसेवकांनी नेहमी लक्षात ठेवले पाहीजे की आपण या कार्यात स्वयंस्फुर्तिने आलेले आहोत त्यामुळे कुठलेही कार्य मी मनापासूनच करेन आणि त्यासाठी मी सदैव तयार असेन.

१. स्वयंसेवकाने बँकासाठी उत्तम ग्राहक बनण्याबरोबरच आपल्या सहकार्यांना मदत करण्यासाठी सदैव तयार रहावे.
२. बँकेच्या अर्थसहाय्याचा उपयोग घालून दिलेल्या अटीनुसार करण्याचा प्रचार व प्रसार करावा व पूर्ण कर्जफेड करण्यात मदत करावी.
३. बँकेच्या अधिकाऱ्यांना चांगल्या कर्ज घेतलेल्या शेतकऱ्यांची माहिती द्यावी
४. ग्रामस्थांच्या विविध अडचणी बद्दल बँका/कृषि विज्ञान केंद्र/सहकारी कार्यालये/राष्ट्रीय बँक यांना माहिती करुन द्यावी.
५. बँक/कृषि विज्ञान केंद्र यांना घेतलेल्या विविध कार्यक्रमांची माहिती देणे त्यासाठीचा खर्च व इतर नोंदी व्यवस्थित ठेवणे.
६. ग्रामिण विकास करण्यासाठी राज्यातील विस्तार संस्था व गांव यामध्ये दुवा म्हणून काम करणे.

### फार्मर्स क्लबच्या नोंदवह्या

विकास स्वयंसेवक वाहिनी (फार्मर्स क्लब) च्या उद्घाटन समयी तीन नोंदवह्या (रजिस्टर) बनविल्या पाहिजेत त्यापैकी एका नोंदवहीमध्ये क्लबच्या बैठकांची कार्यवाही लिहावी. तसेच स्वयंसेवक व अन्य लोक यांच्या उपस्थितीची नोंद त्यामध्ये असावी. प्रत्येक बैठकीच्यावेळी सर्व स्वयंसेवकांची नावे नोंदवहीमध्ये लिहीली पाहिजेत व त्यापुढे उपस्थित स्वयंसेवक व अन्य ग्रामिण लोकांच्या सह्या/अंगठे घेणे जरुरीचे आहे. या नोंदवहीत सुरुवातीला तीन ते चार पानांवर फार्मर्स क्लबच्या संदर्भात आवश्यकतेनुसार नियमावली लिहावी.

दुसऱ्या नोंदवहीमध्ये फार्मर्स क्लबचे पदाधिकारी, संबंधित बँक, कृषि विज्ञान केंद्र/महाराष्ट्र शासनाचा कृषि विभाग अन्य संलग्न विभागाचे अधिकारी इत्यादिंचे पूर्ण पत्ते, दुरध्वनी क्रमांक यांची नोंद करुन ठेवावी. त्यामुळे त्यांच्याशी समन्वय साधताना बरीच मदत होते. तसेच या दोन नंबरच्या नोंदवहीमध्ये नवीन योजना, पीक कर्ज घेण्यासाठी आवश्यक बाबी, इत्यादी माहितीची नोंद ठेवता येते. तिन नंबरच्या नोंदवही (रजिस्टर) मध्ये क्लबच्या दैनंदिन खर्चाची, शिल्लक, बचत यांची नोंद ठेवावी.


लेखक

**प्रा. प्र. अ. गोंजारी**
प्रशिक्षण सहयोगी (कृषि विस्तार)

**प्रा. ला. रा. तांबडे**
प्रशिक्षण संयोजक

संपादक आणि प्रकाशक

**प्रा. लालासाहेब रा. तांबडे**
प्रशिक्षण संयोजक
कृषि विज्ञान केंद्र, सोलापूर.




(श.कृ.प.)

(भाकृ अनुप)

# फार्मर्स क्लब द्वारे कृषि तंत्रज्ञान प्रसार



## कृषि विज्ञान केंद्र, सोलापूर.


गट नं. २२/१, बार्शी नाक्याजवळ, बार्शी रोड, खेड, पो. केगांव,
ता. उत्तर सोलापूर. जि. सोलापूर. (म.रा.) पिन - ४१३ ००१.
फोन : (०२१७) २३५०३५१, २३८००६३ (नि.), फॅक्स : (०२१७) २३५०१५३

